ब्रह्मतेजो बलंबलम्



हीरकमहोत्सवी

कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

मासिक

# नवस्नेह

स्थापना : १९६४

६१

वर्ष ११ वे : अंक ९

डिसेंबर २०२५

स्वागतमूल्य

₹ २०/-



• प्रेषक •

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,

कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५

Visit us on www.kolhapurchitpavan.com

ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com

https: //www .facebook.com/kolhapurchitpavan

## श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा





संघातर्फे दरवर्षी साजरा करण्यात येणारा श्री अष्टमी जागर सोहळा दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी पार पडला. हा सोहळा यू ट्यूब लाईव्ह व फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून जगभर पाहिला गेला. सुमारे ८ ते १० हजार भाविकांनी देवीचे दर्शन घेतले तर सुमारे ७०० भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या कार्यक्रमासाठी चित्पावन महिला मंडळ, वुई फॉर अवर्सचे कार्यकर्ते तसेच संघाचे आणि परशुराम पतसंस्थेचे सर्व संचालक मंडळ यांचे बहुमोल सहकार्य झाले.



## नवस्नेह दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन

यावर्षीच्या नवस्नेह दीपावली विशेषांकाचे अष्टमी जागर सोहळ्यात दि. २९ सप्टेंबर रोजी दामोदर शिवराम आणि कं. चे श्री. सुबोध गद्रे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी संपादिका सौ. मंजुश्री गोखले, अध्यक्ष श्री. मकरंद करंदीकर, उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे यांचेसह सर्व संचालक मंडळ सदस्य उपस्थित होते.

## दिवाळी फराळ

ह्यावर्षीपासून सर्व ब्राह्मण संस्थांनी एकत्र येवून दिवाळी फराळ हा कार्यक्रम घेण्यास सुरूवात केली. त्यानुसार दि. २१ ऑक्टोबर २०२५ रोजी दिवाळी मुहूर्तावर कोल्हापूर चित्पावन संघ, ब्राह्मण सभा करवीर-मंगलधाम आणि कऱ्हाडे ब्राह्मण संघ यांनी मिळून मंगलधाम येथे या कार्यक्रमाचे आयोजन केले. या संस्थांचे पदाधिकारी, संचालक मंडळ सदस्य आणि सभासद अशा सुमारे ३०० जणांनी या फराळाचा लाभ घेतला.








## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष ११ वे : अंक ९ : डिसेंबर २०२५**

- **संपादक** : श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका :** प्रा. सौ. मंजुश्री गोखले
  मोबा. : ८८०५३५५२००
- **सल्लागार** : सौ. पल्लवी देशमुख
  मोबा. : ९४२०४५५९८४


## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १) | **संपादकीय** | ४ |
| २) | **दिवाळी आणि अदिवाळी** – कमला हर्डीकर | ५ |
| ३) | **भारतरत्न** –विकास मेहेंदळे | ९ |
| ४) | **सोहळे की संपत्ती प्रदर्शन** – प्राजक्ता पटवर्धन | ११ |
| ५) | **मी सायकलवरुन केलेली देवभूमी-तील चारधाम यात्रा** – ओंकार गाडगीळ | १४ |
| ६) | **संजीवन समाधी घेतल्यानंतर शरीराचे काय होते?** | १५ |
| ७) | **अपेक्षा जाती विरहित हिंदुसमाजाची** – मोहन नातू | १७ |
| ८) | **GST नोंदणी आणि पालन** – महेश दामले | १९ |
| ९) | **इतिहासातील कर्तृत्ववान ब्राह्मण स्त्रिया** – वैदेही जोशी | २२ |
| १०) | **वधूवर माहिती यादी** | २५ |



- **मुद्रण स्थळ** : मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स
  १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
  मोबा. : ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** : दीपक मारूती घंटे
  श्री डी.टी.पी. सर्व्हिसेस, कोल्हापूर.
  मोबा. : ९४२३२८२३२४




हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ


मंगळवार पेठ, मोबा. : ७६२०५४६२२५
फोन : (०२३१) २५४६२२५/(०२३१) २९९१६७३



- **संचालक मंडळ :**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष)
मोबा. : ९४२१११३००५
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष)
मोबा. : ९८२२२४८५००
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह)
मोबा. : ७५८८८३९५२७
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह)
मोबा. : ८४५९०१९०९१
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार)
मोबा. : ८१४९४८००३४

- **संचालक :**

**श्री. सदानंद दिनकर मराठे,** मो. ०२३१-२५४१८२३
**सौ. सीमा सुरेश गोखले,** मो. ९४२०४५५१५९
**श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये,** मो. ९४०४२६०४७०
**श्री. किरण विनायक जोशी,** मो. ९८९०००३८१०
**श्री. श्रीकांत अनंत लिमये,** मो. ९४२३९८०३८०
**श्री. दत्तात्रय वामन आपटे,** मो. ९४२२०४३३६६

- **तज्ञ सल्लागार :**

**श्री. प्रसाद खाडिलकर,** मो. ९८२२०८४३०५

- **सल्लागार :**

**श्री. विष्णू दिनकर वझे,** मो. ९६३७२५५९८४
**श्री. मोहन मधुकर दातार,** मो. ९८८१८७४७०१
**श्री. शिरीष श. ताम्हनकर,** मो. ९४२२५९००२५
**श्री. निनाद खरे,** मो. ७०५७१५१५४९
**श्री. महेश खाडिलकर,** मो. ९४२२०४६६११


कामकाजाची वेळ

**सकाळी ११ ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.


**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' बँक खात्यांची माहिती पान क्र. ६ वर दिली आहे.**

# संपादकीय...

नमस्कार मंडळी! कसे आहात? सध्या तरी मस्त थंडी पडते आहे! पण अंक तुमच्या हातात पडे पर्यंत काय होईल सांगता येत नाही. सध्या तरी असं बोललं जातय की हवामानाचा अंदाज कोणी देऊ नये. कोणत्याही महिन्यात कसलंही हवामान पडू शकतं. मला वाटतं हे वातावरण अशी बनवाबनवी माणसांकडूनच शिकलं असणार. घरात एक, दारात एक, अंगणात एक आणि बाहेर एक! असो.

मित्रांनो, दिवाळी अंक वाचलात का? आपल्या नवस्नेहचा वाचलात का? आवडला का? कळवलं नाहीत. एक / दोघांनी कळवलं. अर्थात तेवढंही पुरेसं आहे. शितावरून भाताची परिक्षा! नाही का? आता मित्रांनो हा अंक डिसेंबरचा. म्हणजे या २०२५ या वर्षातला शेवटचा अंक. आता आपण भेटणार पुढच्या वर्षी, २०२६ मध्ये.

मित्रानो, या नवीन वर्षात आपल्या अंकात आपण नवीन विषयांची सुरवात करतो आहोत. त्या विषयांबद्दलची ओळख तुम्हाला या डिसेंबरच्या अंकात वाचायला मिळेल. सर्वांना आवडतील असे, माहितीपूर्ण विषय आहेत हे! विचार करायला लावणारे, चांगला विचार शिकवणारे. कारण

सोच और पानी
हमेशा साफ होना चाहिए।
खराब पानी तबियत बिगाड देता है।
और खराब सोच जिंदगी॥

म्हणूनच हे नवीन विषय चांगले विचार पेरतील, चांगले माहिती देतील!

मित्रांनो! सध्याच्या या चंचल हवामानामुळे प्रकृतीवर परिणाम होतो आहे. त्यामुळे डॉक्टर लोकांची चलती असली तरी प्रकृती बिघडण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यासाठी सकस आहार, व्यायाम आणि चांगले विचार यांची गरज आहे. आहार, व्यायाम प्रत्येकाने आपापला करायचा आहे. चांगले विचार आम्ही देतो ! त्यासाठीच तर आपला नवस्नेह आहे !

मित्रांनो, आता या थंडीत धुंधुरमास आलाच आणि धुधुरमासाचा कार्यक्रमही आलाच. त्याचाही आपण आस्वाद (दोन्हीचा, भोजनाचा आणि कार्यक्रमाचा) घेणारच आहोत. तो दिवस आहे ४ जानेवारी २०२६. अर्थाच त्या संदर्भातली संपूर्ण माहिती अंकात वाचता येईलच. तेव्हा नवस्नेहच्या परिवाराकडून तुम्हा सर्वांना नवीन इंग्रजी वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा ! हे नवीन वर्ष तुम्हा सर्वांना सुख-समृद्धीचं, भरभराटीचं, समाधानाचं, सुरक्षेच आणि आरोग्यपूर्ण जावो ही भगवान परशुराम चरणी प्रार्थना ! धन्यवाद !

आपली स्नेहांकित,
**सौ. मंजुश्री गोखले**
मोबा. : ८८०५३५५२००

**• नवीन तहहयात सभासद होण्याची संधी •**

*संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.*

# दिवाळी आणि अदिवाळी

## (मनाला खुपणारं कागदावर - लेखांक ३)

कोणत्याही देशात साजरे केले जाणारे सण, विविध उत्सव हे त्या देशाची संस्कृती, धर्म आणि लोकांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सांगतात. भौगोलिक विविधता असलेला, मानवतेची आई म्हणून गौरविला गेलेला, त्याच्याकडे येणाऱ्या अनेक विचारधारा आणि सांस्कृतिक मूल्ये आपल्यामध्ये सामावून घेण्याची विलक्षण ताकद असलेला आपला हिंदुस्तान अनेक रंगीबेरंगी आणि अर्थपूर्ण उत्सवानी अनेकांचं आकर्षण ठरला आहे. संपूर्ण वर्षभर असंख्य लहान मोठे सण,उत्सव, व्रत, उपासना, जागर इ. साजरे करणारा भारत हा एकमेव देश आहे. हे सर्व घटक आमच्या सनातन धर्माचे आणि संस्कृतीचे अविभाज्य अंग आहेत. नेहमीच्या त्याच त्या चाकोरीबद्ध आयुष्यातून वेगळेपणाचे आनंदाचे चार क्षण म्हणजे सण! स्वत:ची आणि पर्यायाने संपूर्ण समाजाची एकसंघता आणि उन्नती करण्याचे साधन म्हणजे उत्सव !

जगात सर्वात प्राचीन म्हणून गणल्या गेलेल्या धर्म आणि संस्कृतीमध्ये भारतीय संस्कृती आणि आमचा सनातन धर्म यांचे स्थान निश्चितच खूप वरचे आहे. मानवाचे आणि संपूर्ण समाजाचे ज्यामुळे पालनपोषण होईल, जीवन सुखावह होईल, समाजातील सर्व स्तरावर पवित्र आणि घनिष्ट संबंध निर्माण करणारी विचारधारा आणि त्याला अनुकूल आचरणांचे पालन करणे म्हणजे सनातन धर्म. पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश या चैतन्यदायी शक्तीवर मानवाचे सुखी जीवन आणि अस्तित्व अवलंबून असते. या शक्तींनी संहारक होऊ नये म्हणून त्यांची आराधना सुरू झाली. जसजसा धर्माचा विकास होत गेला, लोकसंख्या वाढू लागली. तसतसे नवी दैवते, अवतार, संत, मार्गदर्शक गुरु निर्माण झाले. सण आणि उत्सवांची संख्या वाढू लागली. या सर्वांचे नियमन करण्यासाठी ठराविक ऋतू, ठराविक महिना, तिथी इ. निश्चित झाले. विविध देवतांशी निगडीत सण, उत्सव सुरू झाले. याबरोबरच वर्षप्रतिपदा, अक्षयतृतीया, नागपंचमी, ऋषीपंचमी, नारळी पौर्णिमा, दसरा, दिवाळी, संक्रात इ. धर्मनिरपेक्ष सण, उत्सव सुरू झाले. या सणांचे मूळ ऋतूशी किंवा शेतीशी निगडीत असतं किंवा मानवी जीवनासाठी अत्यावश्यक असलेल्या निसर्गातील घटकांशी जोडलेलं असतं.

तेज या पंचमहाभूतापैकी घटकाशी निगडीत उत्सव म्हणजे दिवाळी किंवा दीपोत्सव किंवा दीपावली. दीड ते दोन हजार वर्षांपासून भारतात दीपावली साजरी केली जात असल्याचे दाखले मिळतात. आजही भारतात जवळजवळ सगळीकडे हा उत्सव साजरा केला जातो. धर्मशस्त्रानुसार या दीपोत्सवाची सुरवात दिवाळीने होते आणि सांगता त्रिपुरारी पौर्णिमेने होते. यामुळे अश्विन महिन्यातले शेवटचे तीन दिवस आणि कार्तिक महिन्यातील १५ दिवस असा प्रदीर्घ १७ ते १८ दिवस या दीपोत्सवाचा कालावधी असतो. पावसाळ्यातील ढगाळ, कुंद हवा, पाऊस पुरेसा पडेल ना? महापूर तर येणार नाही ना? अशा विचारांचा काळोख मनात दाटलेला

आणि पावसाळ्यातील रात्रीही अंधाऱ्या. ज्या कोजागरी पौर्णिमेपासून पथ्वी रात्रीही चांदण्याने उजळू लागते त्या दिवसापासून माणसाला तेजाचे, प्रकाशाचे वेध लागतात आणि मग सुरू होतो हा चैतन्यदायी प्रदीर्घ दीपोत्सव !

उत्पत्ती आणि लय हा निसर्गनियम आहे. जन्माला आल्यावर मृत्यू अटळ आहे. पण हा मृत्यू अकाली येऊ नये. कृतार्थ, निरोगी दीर्घायुष्य जगल्यावर मृत्यू यावा म्हणून धनत्रयोदशीला मृत्यूची देवता यमराज याची प्रार्थना केली जाते. तसेच निरोगी आयुष्य मिळावे म्हणून आरोग्यदेवता धन्वंतरीचीही पूजा केली जाते. ही देवता जणू सांगत असते, ऋतूनुसार सुयोग्य आहार विहार हाच निरोगी आयुष्याचा मूलमंत्र आहे. दिवाळी पासून थंडीची चाहूल लागते. थंडीचा ऋतू हा आरोग्यवर्धन करू शकतो. पण यानंतर येणाऱ्या उन्हाळ्याला सामोरं जाण्यासाठी स्निग्ध पदार्थांचा आहारात समावेश करणं योग्य ठरतं. दिवाळी फराळातील विविध जिन्नस आपोआपच शरीराची ही गरज भागवतात. आजकाल शेतीमध्ये यांत्रिक अवजारांचा उपयोग केला जातो. पण प्रामुख्याने अनेक शतके शेती ही बैलावर अवलंबून होती. बैलाला जन्म देणाऱ्या गोमातेची पूजा तिच्या वासरासह धनत्रयोदशीच्या आदल्या दिवशी म्हणजे गोवत्सद्वादशी किंवा वसुबारसला केली जाते आणि विपुल दूध देणाऱ्या म्हशीचं कोडकौतुकही दिवाळी पाडव्याला केलं जातं.

तेजाचा पूजक होऊन जगा! सदैव अंधारातून प्रकाशाकडे-तेजाकडे जा! हा अंधार अज्ञानाचा असेल, अज्ञानाकडून ज्ञानाकडे जा! हा अंधार आळसाचा, दारिद्र्याचा, मीपणाचा, अहंपणाचा, गर्वाचा, दुष्टपणाचा किंवा उन्मत्तपणाचा असेल. हे सर्व दुर्गुण तुमचं आयुष्य दु:खी, अंध:कारमय करतात. या सर्व दुर्गुणांचा त्याग करून तुमचं आयुष्य उजळा. मी पणा सोडून आम्ही ही भावना जोपासा. समाजासाठी काहीतरी करा. तुमच्या घरात कष्ट करून उदरनिर्वाह करणाऱ्याला आनंदाचे चार क्षण देणं म्हणजे दिवाळी. ज्यांचं आयुष्य अंध:कारमय आहे त्यांना अन्न-वस्त्र देऊन त्यांचं आयुष्य उजळून टाका. स्वत: आनंदाने जगा आणि इतरांना आनंदाचे क्षण वाटा. यासाठी शरीराचे डोळे, नाक, कान, जीभ आणि त्वचा या पंचेंद्रियांना त्रास न होता ती तंदुरुस्त, तृप्त आणि समाधानी असली पाहिजेत. चैतन्यरूपी दिवाळीतील मूळ प्रथा आपोआपच ही पंचेंद्रिये निरोगी, तृप्त करण्याला कारणीभूत ठरतात. पण - त्यांचा मंद प्रकाश, आकाश कंदिल, विद्युत रोषणाई, दारातील रांगोळी यामुळे डोळे सुखावतात. योग्य आवाजातील संगीत यामुळे कान, सुगंधी तेल,


**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**

**युनियन बँक ऑफ इंडिया,**
**महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नांव : **कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 641002050000001)**
IFSC Code :**UBIN0564109**
**येथे पाठवा व KYC पाठवा.**

**किंवा**

**बँक ऑफ इंडिया**
**महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नांव : **कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 090210110016181)**
IFSC Code :**BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

साबण, उटणे यामुळे नाक आणि त्वचा तर रुचकर फराळ खाऊन जीभ सुखावते. नरक चतुर्दशी दिवशी व इतरही दोन-तीन दिवस पहाटेच्या सुखद थंडीत अंगाला तेल चोळून त्यानंतर गरम पाण्याची होणारी अंघोळ केवळ त्वचा नव्हे तर संपूर्ण शरीराला ताजेतवाने करते, कारण या अंघोळीमुळे रक्ताभिसरण उत्तम होते!

भेटवस्तूंची देवाण-घेवाण, शुभेच्छा कार्ड, फोनवरील संदेश याद्वारे माणसा-माणसांतील अंतर कमी होते. या सणात गायीला, वसुबारसेच्या दिवशी ओवाळले जाते. पाडव्या दिवशी पत्नी पतीला, भाऊबीजेला बहीण भावाला ओवाळते. आई मुलांना, आजी नातवंडाना ओवाळते. एवढेच नव्हे तुलसी विवाहात तुळशीलाही ओवाळले जाते. निरंजनातील एकमेकींना आधार देणाऱ्या दोन वातीप्रमाणे ओवाळण्याच्या या विधीतून नात्यांची वीण घट्ट गुंफली जाते. दिवाळी ही केवळ मौजमजेचा उत्सव नाही. या उत्सवात प्रकाशित केले जाणारे दिवाळी अंक मेंदूलाही ज्ञानाच्या प्रकाशाच्या फराळाने समृद्ध करतात. भाऊबीजेनंतर दहा दिवसांनी साजरा केला जाणारा तुळसी विवाह या दीपोत्सवाचे अगदी वैशिष्ट्यपूर्ण अंग आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी, जमिनीची धूप थांबवून पूर नियंत्रणासाठी एकविसाव्या शतकात 'झाडे लावा-झाडे जगवा.' ही केली जाणारी घोषणा या तुलसी विवाहाच्या मागे आहे. भारताच्या सर्व भागात उगविणारी आणि वाढणारी, औषधी गुणधर्म असलेली तुळस सर्व झाडांचे प्रतिनिधीत्व करते. तुळशी विवाहानंतर समाजामध्ये लग्नाचे महूर्त सुरू होतात. हा विवाहसोहळा जणू माणसाला सांगत असतो, ''तुम्ही लग्न करून तुमचं कुटुंब वाढवा, तुमची लोकसंख्या वाढू दे. पण या वाढत्या लोकसंख्येला अन्न, वस्त्र, निवारा आणि मृत्यूनंतर दहनासाठी लाकूड पाहिजे असेल तर आधी झाडांच्या संख्या वाढवा. योग्य जागी झाडे लावत रहा आणि या झाडांना जगू द्या. वाढू द्या.'' झाडांशिवाय मनुष्य प्राणी जगूच शकणार नाही. यासाठी विनाकारण झाडे न तोडता झाडांच्या संख्येत भर घालत रहा. त्रिपुरारी पौर्णिमेला देवळांची शिखरे दीपप्रकाशाने उजळून उत्सवाची सांगता होते. देवळाचं शिखर म्हणजे मानवी देहाचं मस्तक. आपला मेंदू, आपले विचार ज्ञानरूपी प्रकाशाने उजळा असच जणू यातून सूचित केलं जातं.

बदलत्या काळाबरोबर उत्सवांचं स्वरूपही बदलणार हे मान्य आहे. मात्रं हे बदलणं नव्हे हे बिघडणं आहे. दिवाळी अदिवाळी झाली आहे. दिवाळी हा तेजाचा, चैतन्याचा प्रकाशाचा, हर्ष आणि उल्हासाचा आरोग्यदायी उत्सव न राहता हा फटाके महोत्सव होऊ लागला आहे. वसुबारसपासून तुळशीच्या लग्नापर्यंत प्रचंड प्रमाणात मोठ्या आवाजाचे फटाके उडविले जातात. यामुळे डोळे चुरचुरतात, घसा खवखवतो, आवाजाचा कानाला त्रास होतो. मुक्या प्राण्यांच्या आणि पशुपक्ष्याच्या हे फटाके मुळावर येतात. पर्यावरणाचा मोठा ऱ्हास होतो. हवेचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. हवेच्या प्रदूषणामुळे दिवाळीनंतर ताप-खोकल्याने

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत. तसेच ज्यांना नवस्नेहचा अंक मिळाला नसेल त्यांनी संघ कार्यालयात कळवावे. त्यांना अंकाची पीडीएफ व्हॉटस् ॲपवर पाठविली जाईल.**

आजारपण सुरू होते. उत्सवाचा मूळ गाभाच हरवून बसलेली ही दिवाळी अदिवाळी होते. दिवाळीमध्ये आपण लक्ष्मीपूजन करतो. हे लक्ष्मीपूजन सांगतं - धन किंवा वित्त हे लक्ष्मीचं एकच रूप नाही. धनलक्ष्मी, आरोग्यलक्ष्मी, ज्ञानलक्ष्मी, सुभाव-लक्ष्मी, सुविचारलक्ष्मी, सौंदर्यलक्ष्मी ही अनेक लक्ष्मीची रूपं आहेत. या साऱ्यांमुळे आपलं भाग्य उदयाला येतं. दिवाळीसाठी घराची स्वच्छता आणि सजावट करणारे आपण सार्वजनिक स्वच्छता आणि सौंदर्य जपतो का?

दिवाळी हा नाती जपणारा, नात्याची वीण घट्ट करणारा, नाती वाढविणारा सण. पूर्वी नातेवाईक दिवाळीत घरी एकत्र जमत. मुलीच्या किंवा बहिणीच्या सासरच्या लोकांनाही बोलाविले जाई. शेजाऱ्यांना, मित्र-मैत्रिणीना घरी फराळाला आवर्जून निमंत्रित केले जात असे. याबाबत आजकाल आवड आणि खरं तर सवड कमी होऊ लागली आहे. आपण कुणाकडे गेलो तर त्यानाही आपल्याकडे बोलवावं लागेल असा विचारही केला जातो. आजकाल अनेक कुटुंबे दिवाळीच्या दिवसात कुणा नातेवाईकांकडे जाण्याऐवजी सहलीला जाणे पसंत करतात. दिवाळी या उत्सवाचा मूळ गाभाच याद्वारे हरवला जातो. त्यामुळे दिवाळीच्या दिवसात घरापासून दूर जाऊन राहणं ही मला तरी अदिवाळीच वाटते. आपलं घर, आपली वास्तू या दिवसांत प्रकाशमय, तेजोमय राहिली पाहिजे ही तर दिवाळीची मुख्य संकल्पना. त्यामुळे खिडक्या बंद करून, घर कुलूपबंद करून जाणं ही निदान मला तरी अदिवाळीच वाटते. या बाबत मतभेद होऊ शकतील. सहलीला आपण कधीही जाऊ शकता, पण दिवाळीचे ४-५ दिवस एकदाच येतात. ज्याप्रमाणे फ्रेंडशिप डे ठराविक दिवशी आणि विशिष्ट चाकोरीतून करतो, त्याप्रमाणे हा प्रकाशाचा उत्सव करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असं नमूद करावसं वाटतं. नव्याचा स्वीकार करताना सगळं जुनं टाकलंच पाहिजे असं नसतं ना? खरं तर असं करणं योग्यही नाही. विज्ञान आणि शास्त्राचा पाया असलेली आपली संस्कृती आणि तिच्याशी निगडीत प्रत्येक गोष्ट आपण समजून घेतलीच पाहिजे.

पन्नाशीच्या वयाचे आईवडील आणि त्यांची मुलं किंवा आजी आणि नातवडं यांच्यामध्ये संवाद ऐकू येतो, हे बघा उद्या नरकचतुर्दशी, पहाटे लौकर उठायचं. मी अंगाला तेल लावेन. गरम पाण्याने उटणे लावून अंघोळ करायची!

ए आई/आजी, उगाच काहीतरी करायला सांगू नकोस. रोजच्या प्रमाणं आम्ही आठच्या पुढचं उठणार. शिवाय उद्या सुटी आहे!

बरं बाबानो, तुम्ही आता मोठे झालात. तुम्हाला काय सांगणार? पण अशी अंघोळ आरोग्यदायी असते. फराळ-लाडू, करंजी, चकली हे तरी खाल ना?

खाऊ जरासं पण पिझ्झा मागवूया का?

कसलं रे ते मैद्याचं खाता? त्यापेक्षा छान तुपात / तेलात केलेलं फराळाचं खा. अंगाला लागेल.

या अशा संवादानं मन नाराज होतं; पण मी तरी त्यांना समजावून, थोडसं रागवून करायलाच लावते. तरीही मनात विचार येतोच-चल-अचल, चर-अचर, ज्ञान-अज्ञान याप्रमाणे दिवाळी-अदिवाळी होऊ पाहते आहे कां?

हा विचार मनाला खुपत राहतो हे नक्की!

**- कमला हर्डीकर**

मोबा. : ९४२०४५८४२५, ९६८९३६९९२६

● ● ●

# भारतरत्न

भारतरत्न हा भारतातील सर्वोच्च नागरी सन्मान आहे. देशासाठी सर्वोच्च प्रतीचे काम करणाऱ्या, भारताची कीर्ती जगभरात वृद्धिंगत करणाऱ्या व्यक्तीस हा सर्वोच्च नागरी सन्मान देऊन गौरविले जाते. अशा व्यक्तींनी उभी हयात यासाठी घालविलेली असते. अनेकांना तर हा सन्मान मरणोत्तर दिला गेला आहे. सेवा, कला, साहित्य, विज्ञान व विश्वशांती, मानव विकास, कारखानदारी इत्यादी क्षेत्रांतील लोकांना, सनदी सेवा बजावलेल्या व्यक्तींना व अन्य अतुलनीय कामगिरी बजावणाऱ्यांना, हा अमूल्य पुरस्कार देऊन गौरवायचे, असा निर्णय इ.स. १९५४ मध्ये तत्कालीन भारत सरकारतर्फे घेण्यात आला. २ जानेवारी १९५४ रोजी भारताच्या राष्ट्रपतींनी त्यावर मान्यतेची मोहर उठवली. १९५५ साली कायद्यात काही बदल करून मरणोपरान्त भारतरत्न देण्याची सोय करण्यात आली. त्यानंतर १२ हून अधिक जणांना मरणोपरान्त भारतरत्न दिले गेले आहे. २०१४ मध्ये वरील क्षेत्रांबरोबरच क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्कारात स्थान देण्यात आले. २०२४ सालापर्यंत५३ जणांना भारतरत्न हा पुरस्कार लाभलेला आहे. त्यात तीन नावे परदेशी व्यक्तींची आहेत. या पुरस्काराचे वैशिष्ट्य व तो देण्यासंबंधीचे नियम भारत सरकारच्या राजपत्रात नमूद केले आहेत. २ फेब्रुवारी १९५४ साली पहिला पुरस्कार डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते दिला गेला.

इ.स. १९९२ साली सुभाषचंद्र बोस यांच्या नावाची भारतरत्न पुरस्कारासाठी घोषणा करण्यात आली होती. परंतु नेताजींच्या मृत्यूचा कुठलाही पुरावा उपलब्ध नसल्याने व त्यांच्या कुटुंबियांच्या विरोधामुळे त्यांचे नाव मागे घेण्यात आले.

सुरवातीला पुरस्कार एका पदकाच्या स्वरूपाचा असेल आणि त्यास भारतरत्न संबोधले जाईल, पदक १.३७५ इंच आकाराच्या व्यासाचे असेल आणि दोन्ही बाजूला गोल कडा असतील, पदकाच्या शीर्ष पटलाच्या मध्ये उगवलेला सूर्य असून त्याची किरणे कडेपर्यंत पसरलेली असतील, सूर्यबिंबावर भारतरत्न देवनागरी लिपीत कोरलेले असेल, पदकाच्या खालील कडेवर पुष्पमाला कोरलेली असेल, पदकाच्या मागील बाजूवर मधोमध भारताचे राजचिन्ह कोरले जाईल व त्याच्या खालील बाजूच्या कडेवर सत्यमेव जयते देवनागरी लिपीमध्ये कोरले जाईल, असे ठरवण्यात आले. पदक ०.२५ इंच रुंदीच्या पांढऱ्या रंगाच्या फितीमध्ये बांधून पुरस्कृत व्यक्तीच्या गळ्यात राष्ट्रपतींच्या हस्तेच घातले जाते. भारतरत्न पुरस्काराने अलंकृत व्यक्तीचे नाव भारत सरकारच्या राजपत्रात प्रकाशित केले जाते आणि राष्ट्रपतींच्या निर्देशाधीन रजिस्टरमध्ये नोंदवले जाते.

एखाद्या व्यक्तीला दिले गेलेले पदक काढून घेणे व त्या व्यक्तीचे नाव रजिस्टरमधून कमी करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असेल. तसेच एकदा काढून घेतलेले पदक पुन्हा त्या व्यक्तीला परत करणे आणि त्याच्या नावाची रजिस्टरमध्ये नोंद करण्याचा आदेश देण्याचा अधिकारही राष्ट्रपतींना राहील. जात, व्यावसायिक प्रतिष्ठा, लिंगभेद या कशाचाही परिणाम या पुरस्काराची पात्र व्यक्ती ठरविताना होणार नाही. प्रत्येक वेळेला रद्द करण्याची व पुनर्नोंदणी करण्याची प्रक्रिया भारत सरकारच्या राजपत्रात प्रकाशित केली जाईल.

राष्ट्रपतींनी दि. ८ जानेवारी १९५५ रोजी राजपत्रातून पदकासंबंधी काही नवीन बदल केले

त्यानुसार राष्ट्रपतींच्या हस्ते त्यांच्या मुद्रेसहित पुरस्कार प्रदान केला जाईल. हे पदक पिंपळाच्या पानाच्या आकाराचे असेल. त्याची लांबी २.३१२५ इंच, रुंदी १.८७५ इंच व जाडी ०.१२५ इंचाची राहील. हे पदक काशाचे बनवले जाईल. याच्या दर्शनी बाजूवर ०.६२५ इंच व्यासाच्या सूर्याची प्रतिकृती कोरलेली असेल. मागील बाजूवर राजचिन्ह कोरले जाईल. सूर्य व घेरा प्लॅटिनमचा असेल. अक्षरांवर चांदीचा मुलामा असेल. २६ जानेवारी १९५७ च्या अधिसूचनेनुसार हे पदक चमकदार काशामध्ये बदलले.

त्यानुसार भारतरत्न मेडल ५.८ सें.मी. लांबीचे, ४.७ सें.मी. रूंदीचे आणि ३.१ मि.मी. जाडीचे पिंपळाच्या पानाच्या आकाराचे कासे धातूचे बनवलेले असते. त्याच्या वरील बाजूवर १.६ सें.मी. व्यासाची सूर्याची आकृती कोरली जाते, ज्याच्या खाली देवनागरी लिपीमध्ये भारतरत्न कोरलेले असते. मेडलच्या मागील भागावर भारताचे राष्ट्रीय चिन्ह चार सिंहांची राजमुद्रा व आदर्श घोषवाक्य कोरलेले असते. सूर्य, राजचिन्ह व कडा प्लॅटिनमच्या आणि शब्द चमकदार पितळेचे बनवले जातात. हे मेडल पांढऱ्या रंगाच्या रिबीनीमध्ये ओवले जाते. कोलकत्याला असलेल्या टांकसाळीत हे मेडल बनवले जाते.

भारतरत्न विजेत्याला खालील सुविधा मिळतात :

यामध्ये व्हीव्हीआयपीच्या समकक्ष श्रेणी, संसदेच्या बैठका व सत्रांमध्ये सहभागी होण्याची सवलत, भारतीय प्रजासत्ताकदिन आणि स्वातंत्र्य दिन समारंभात सन्माननीय अतिथी, भारतामध्ये कुठेही जाण्यासाठी प्रथम श्रेणीचे मोफत विमान व रेल्वे प्रवास तिकिट, पंतप्रधानांच्या वेतनाएवढे किंवा त्याच्या ५०% एवढे निवृत्ती वेतन, आवश्यकेनुसार झेड श्रेणीची सुविधा, माजी पंतप्रधान, केंद्र सरकारमधील कॅबिनेट स्तराचे मंत्री, लोकसभा व राज्यसभेतील प्रमुख विरोधी पक्षनेता, भारतीय योजना आयोगाचे डेप्युटी चेअरमन आणि राज्यांचे मुख्यमंत्री यांच्या नंतरच्या सातव्या स्थानाच्या दर्जाचा सन्मान भारतरत्न विजेत्या व्यक्तीला दिलेला आहे.

सन २०२४ पर्यंत सर्वपल्ली राधाकृष्णन, चक्रवर्ती राजगोपालाचारी आणि चंद्रशेखर वेंकटरामन (१९५४) भगवानदास, मोक्षगुंडम विश्वेश्वरया आणि जवाहरलाल नेहरू (१९५५) गोविंद वल्लभ पंत (१९५७) धोंडो केशव कर्वे (१९५८) बिधन चंद्र रॉय आणि पुरुषोत्तम दास टंडन (१९६१) राजेंद्र प्रसाद (१९६२) झाकिर हुसेन आणि पांडुरंग वामन काणे (१९६३) लाल बहादूर शास्त्री (१९६६) इंदिरा गांधी (१९७१) वराहगिरी वेंकट गिरी (१९७५) के. कामराज (१९७६) मदर तेरेसा (१९८०) विनोबा भावे (१९८३) खान अब्दुल गफारखान (१९८७) एम. जी. रामचंद्रन (१९८८) बाबासाहेब आंबेडकर आणि नेल्सन मंडेला (१९९०) वल्लभभाई पटेल, राजीव गांधी आणि मोरारजी देसाई (१९९१) मौलाना अब्दुल कलाम आझाद, जहांगीर रतनजी दादाभॉय टाटा आणि सत्यजित रे (१९९२) ए.पी.जे. अब्दुल कलाम, गुलझारीलाल नंदा आणि अरुणा आसफ अली (१९९७) एम. एस. सुब्बुलक्ष्मी आणि चिदंबरम सुब्रमण्यम (१९९८) जयप्रकाश नारायण, पंडित रविशंकर, अमर्त्य सेन आणि गोपीनाथ बोरदोलोई (१९९९) लता मंगेशकर आणि बिस्मिल्ला खाँ (२००१) भीमसेन जोशी (२००८) सी.एन.आर.राव आणि सचिन तेंडुलकर (२०१४) मदनमोहन मालवीय आणि अटलबिहारी वाजपेयी (२०१५) नानाजी देशमुख, भूपेन हजारिका आणि प्रणव मुखर्जी (२०१९) कर्पूरी ठाकुर, लालकृष्ण अडवाणी, पी. व्ही. नरसिंहराव, चौधरी चरण सिंह, एम.एस. स्वामीनाथन (२०२४) आदि मान्यवरांना हा भारतरत्न सन्मान दिलेला आहे. **-विकास मेहेंदळे**

● ● ●

# सोहळे की संपत्ती प्रदर्शन

गोंधळलात ना लेखाचं शीर्षक वाचून ? गोंधळात टाकण्यासारखीच सद्य परिस्थिती आहे. सण, वार, लग्न सोहळे, व्रतबंध सोहळा, साखरपुडा या सगळ्या सगळ्या गोष्टी नेमक्या कशासाठी असतात असे प्रश्न आजकाल पडायला लागले आहेत. सोशलमिडिया नावाच्या राक्षसाने या सगळ्या सणांचे, समारंभांचे स्वरूपच बदलून टाकले आहे. पूर्वी हिंदीत म्हण होती.. 'नेकी कर और दर्या मे डाल..' पण आजकाल 'कुछ भी कर, पर फेसबुक इंस्टा पे जरूर डाल' अशी म्हण रूढ होते आहे. कारण आजकाल प्रत्येक श्वास घेतला जातो तोच मुळी सोशल मिडियासाठी असे वाटू लागले आहे.

गणेशोत्सव, नवरात्र, दहीहंडी हे सण.. सण नसून एक शक्तिप्रदर्शन वाटू लागले आहेत. दहीहंडीला कोणत्यातरी हिरोईनला, त्यातल्या त्यात सिरियलमध्ये काम करणारी.. जिला टीआरपी व्हॅल्यू जास्त आहे. अशा नटीला बोलवायचे. ती येऊन करते काय, तर तिथे गरज नसताना उभ्या केलेल्या स्टेजवर बसून, गरज नसताना १-२ वाक्ये भाषण करते आणि मग शोपिस सारखी बसून राहते. हे कशासाठी सगळं? फक्त गर्दी जमवायला? त्या नटीच्या जागी का एखाद्या समाजसेवकाला बोलवावेसे वाटत नाही? इतका मोठा समुदाय आहे. त्या लोकांसमोर एखाद्या भारतीय जवानाला बोलवून त्याचे अनुभव कथन करायला सांगावेसे का वाटत नाही? आणि मग या सोहळ्याचे रिल्स..!

नको इतक्या उंचीवर लावलेल्या हंड्या फोडण्यासाठी रचलेले थर, केलेल्या कसरती.. त्यातून धडपड, चेंगरचेंगरी! नक्की काय मिळवायचे आहे? फक्त प्रसिद्धी? तीही तयार केलेल्या रिल्समधून..? त्या आभासी जगात?

गणेशोत्सवाचे छान असे स्वरूप बदलायला लागून तर अनेक वर्षे झाली. एका गल्लीत ती मंडळे, कोणाचा डीजे जास्त आवज करतो? कोणाच्या स्पिकरवर जास्त घाणेरडी गाणी लागतात? कोणाच्या गल्लीतली पोरं जास्त हिडिस नाच करतात? अशी स्पर्धाच लागलेली आहे. ढोल ताशा मंडळे महिनाभर आधीपासून तयारी सुरू करतात. अनेक ठिकाणी त्यांचा सराव सुरू झालेला असतो. पण त्यातही स्पर्धा! कोणाच्या मंडळातल्या वादकांना मानाच्या गणपतीत वाजवायला बोलवतात.. ? यातून सहकार्याची भावना, एकमेकांना समजून घेण्याची सवय, एकत्रित येऊन काहीतरी विधायक काम करण्याची इच्छा, संयम या गोष्टी नावालाही दिसत नाहीत. दुसरे दिवशीपर्यंत चालणाऱ्या विसर्जन मिरवणुका.. त्या उत्सवाचे पावित्र्य भंग करतात असं नाही का वाटत? ढोलताशा पथकात मुलीही अगदी अभिमानाने जातात. जरूर जावं. अगदी सगळ्या कवायती मनापासून कराव्यात. मुलांच्या बरोबरीने कराव्यात, पण एक व्हिडिओ पाहिला, त्यात एक ताई आपल्या जेमतेम सहा-आठ महिन्यांच्या बाळाला राणी लक्ष्मीबाईंने पाठीला बांधल्याप्रमाणे बांधून जोरजोरात ढोल वाजवत होती. तेही अगदी जोरात .. पूर्ण ताकदीनिशी! आणि त्या व्हिडिओला कॅप्शन होते.. हे संस्कार लहानपणापासूनच असावे लागतात.. मराठी बाणा! काय म्हणावं या वृत्तीला? ज्या बाळाची टाळूही अजून पूर्ण भरलेली नाही त्या बाळाला इतक्या मोठ्या आवाजात बळजबरीने घेऊन जाण्याचा अट्टाहास कशासाठी? काय झाले असेल त्याच्या कानांचे? इतका आवाज कसा सहन केला असेल त्याने? आणि हे असले संस्कार इतक्या लहानपणापासून कशासाठी? फक्त सोशल मिडियावर झळकण्यासाठी? आपल्या चिमुकल्याच्या जीवाची पर्वा न करता? आई अशी असते? असू शकते?

नवरात्रीमध्येही तीच तऱ्हा. नऊ दिवस रात्री ८ वाजल्यापासून सुरू होणारा गरबा, दांडिया हा रात्री १-२ वाजेपर्यंत चालूच असतो. आजूबाजूच्या लोकांच्या झोपेचं आपण खोबरं करतो आहोत याची जाणीव असूनही आपण बदलावे असे वाटत नाही. नवरात्रीमध्ये सगळ्यात जास्त विक्री गर्भनिरोधक साधनांची होते हे काही अहवालावरून समजते. गरबा वाईट नक्कीच नाही. गुजरातचे ते लोकनृत्य आहे. पण आपण महाराष्ट्रात राहतो ना? महाराष्ट्रात भोंडला

किंवा हादगा खेळला जातो. किती सार्वजनिक ठिकाणी भोंडला नाईट आयोजित केली जाते? कुठेही नाही. का नाही वाटत की सार्वजनिक भोंडला करावा. जमलेल्या रकमेतून खिरापत करावी. उरलेली रक्कम समाजोपयोगी कार्यासाठी वापरावी. पण हे कधीच होत नाही. कारण भोंडल्याला तेवढं ग्लॅमर नाही. मोठमोठ्या आवाजात गाणी लावून नाचता येत नाही. भोंडल्याची गाणी फेर धरून गायली जातात.. त्यावर नाचता कसे येईल? गरबा खेळतानाचे व्हिडिओ अप्लोड करण्यासाठी चाललेली अहमहमिका..! काय बोलावं? कोणी किती ठिकाणी गरबा खेळायला गेलं होतं? यावरून तुमचे समाजातले स्थान ठरते. तुमच्या व्हिडिओला आलेले लाईक्स तुम्ही सोशल व्हायला लायक आहात की नाही ते ठरवतात. त्या चौकोनात दिसणाऱ्या आभासी जगात जगण्यासाठी आपण नेमके काय गमावतो आहोत हे कधी तरी समजेल का?

सर्वसाधारण १० वर्षांपूर्वीपर्यंत लग्न दोन दिवसात उरकायची. संध्याकाळी कार्यालयात जायचं, सिमांत पूजन व्हायचं. त्यानंतर कार्यलयातच नवरानवरीकडची मंडळी गाण्याच्या भेंड्या किंवा विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम गोल करून, कार्यालयाच्या डीम लाईट्मध्ये मैफिल जमवायचे. दुसरे दिवशी पहाटे सगळी इतर वऱ्हाडी मंडळी उठायच्या आधी घरातल्या मोठ्या बायका नवरा नवरी आणि तिच्या कुटुंबियांना हळद लावायचे. घाणा भरला जायचा. आणि पावलापासून सुरुवात करून हळद चढवायची आणि उतरवायची.. तेही आंब्याच्या पानांनी. अगदी बरोबर मुहूर्तावर लग्न लागायचं. लग्नाचे विधी योग्य तऱ्हेने व्हायचे. जेवणावळी उठायच्या आणि मग वधूची पाठवणी. मराठीमोळी लग्नं अशीच असायची, आणि त्यात एक गोडी होती. मुंजी व्हायच्या त्यात सुद्धा ग्रहमख झाले की मुंजीचा मुहूर्त.. आधीचे विधी, नंतरचे विधी, भिक्षावळ झाली की मुंज झाली. गोटा केलेला गोंडस बटू सगळ्यांच्या नजरेत भरायचा!

पण आता या सगळ्याचे इव्हेंट्स होतात. प्री-वेडींग शूटच्या नावाखाली लाखो रुपये खर्च केले जातात. आणि हे व्हिडिओ सोशल मिडियावर व्ह्यूज आणि लाईक्स मिळवत राहतात. पण पुढे काय? एका लग्न होऊ घातलेल्या नवरानवरीचा प्रीवेड शूट दोन डोंगरांच्या मधल्या दरीत दोर बांधून त्यावर चालतानाचा केलेला पाहिला. तो मुलगा त्याच व्यवसायातला होता म्हणे.. पण तरीही ती मुलगी? तिला भीती नसेल का वाटली? तिला कुठे सवय होती याची? चुकून जरी तिच्याकडून चूक झाली असती तर? इव्हेन्टवाले सांगतात आणि बुद्धी गहाण टाकल्यागत हे सगळे करतात.

पूर्वी घरातील ग्रहमक झाल्यावर रात्री घरातच बहिणी, मावश्या, आत्यांच्या सोबत चालणारा मेहंदी सोहळा आता एक इव्हेंट झाला आहे. त्याच्यासाठी स्टेज लागते. बसायला वधूला एक छानशी खुर्ची लागते. स्टेजच्या मागच्या बाजूला नक्षीदार पडदा लागतो. मेहंदीचे कोन ताटात फुलांच्या सजावटीत सजवून आणावे लागतात. या मेहंदी सोहळ्याला खास शेवाळी हिरव्या रंगाचे कपडेही सर्वांनी घालावे लागतात आणि हे सगळे कशासाठी? फक्त आणि फक्त सोशल मिडियावर पोस्ट करण्यासाठी. नुसता मेहंदी सोहळा नसतो लग्नात, मग हळदपण असते. म्हणजे हल्दी प्रोग्रॅम असतो ना! त्यासाठी लग्नाच्या हॉलमध्ये इव्हेंट वाल्यांनी पूर्ण सजावट केलेली असते. मोठ्या कमळाच्या आकारात दोन खुर्च्या ठेवलेल्या.. त्यात वधूवर बसतात आणि नाजूकपणे लावली जाणारी हळद सरसकट रंगपंचमी खेळल्याप्रमाणे वराचे मित्र आणि वधूच्या मैत्रीणी सगळ्यांना फासली जाते. लावली जात नाही. किलो किलोने झेंडूच्या फुलांच्या पाकळ्या एकमेकांच्या अंगावर फेकल्या जातात. त्या फेकताना, स्लो मोशन मध्ये, इकडे फेकताना, तिकडे बघताना, हजारो पोजेसमध्ये फोटोग्राफर व्हिडिओ आणि फोटो घेत असतो. जोरात संगीत वाजत असते आणि झेंडूच्या पाकळ्या इकडून तिकडे फेकल्या जात असतात.. हळदीलासुद्धा कपडे पिवळ्या रंगाचेच. घरातले कपडे घालून पाटावर बसून ओवाळून, घाणा भरून हळद लावणे ही गोष्ट आता नामशेष होते आहे की काय? या विधी मागचे शास्त्र काय आहे ? हे कोणी लक्षात घेतच नाही.

मेकअप करणे ही नक्कीच एक कला आहे. लग्न समारंभात टीव्ही मालिकांमधल्या नट्यांप्रमाणे नटलेल्या स्त्रिया. त्यात प्रत्येक इव्हेंटला मेकअप वेगळा. हेअर

अक्सेसरीज वेगळ्या, दागिने वेगळे. मान्य आहे लग्न सहसा एकदाच होतं.. पण तरीही या सगळ्या उधळपट्टीला काही मर्यादा आहे की नाही? या पुढची गोष्ट आणखीनच वेगळी, कारण संगीतपण असते ना? त्यासाठी वधू-वर दोन्ही पक्षाकडची सगळ्याच वयोगटातली मंडळी कसून तयारी करत असतात. कुठेही आपण समोरच्यापेक्षा कमी पडू नये म्हणून घरातल्या सगळ्या लोकांना वेठीला धरले जाते. सर्वसाधारण शाळेत गॅदरिंग करावं तशाप्रकारे विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम पूर्ण तयारीनिशी केला जातो. २ तास चालणारा हा कार्यक्रम पण त्यासाठी दोन महिने आधीपासून त्याची तयारी. मग त्यासाठी लागणारे कपडे. त्याची खरेदी! आपण हे नेमके काय करत आहोत?

लग्नाच्या आदल्या रात्री अगदी ऐनवेळी जमणाऱ्या मैफिली, त्यातून उत्फूर्तपणे केले जाणारे विविध गुणदर्शन, गाणी, भेंड्या.. यातून मिळणाऱ्या ऊर्जेची सर आताच्या ठरवून केलेल्या गॅदरींगला कशी येईल?

उत्तर भारतात चालणाऱ्या या रिती त्या त्या प्रदेशाप्रमाणे बनवलेल्या आहेत. पण आपण उत्तर भारतात नाही आहोत ना? आपण महाराष्ट्रातच आहोत. आपली भौगोलिक परिस्थिती, सामाजिक परिस्थिती, ऐतिहासिक पार्श्वभूमी उत्तर भारतीय लोकांपेक्षा वेगळी आहे.

लग्नाच्या दिवशी तरी वरातीत होणारा नाच! यावर लिहायचं म्हटल तर वेळ कमी पडेल. नवरा नवरीने आपल्याच लग्नाच्या वरातीत जीवतोड नाचणे.. हे आजकाल फॅड होऊ लागले आहे. वरातीनंतर स्टेजच्या दिशेने होणारा प्रवेश! यावर दोन्हीकडचे आईवडील कितीही खर्च करू शकतात. लिक्वीड नायट्रोजनचा धूर करणे, तलाव तयार करून त्यात कमळातून मुलीला आणणे, किंवा वरून ती चंद्रावरून आली असे दाखवायला चंद्र बनवणे आणि त्यावर तिला बसवून वरून मोटर आणि पुलीच्या साहाय्याने अलगद खाली आणणे.. !

आणि हे सर्व कशासाठी? सोशल मिडियावर आपले वेडिंग किती ग्रॅन्ड झाले हे दाखवण्यासाठी!

नवरा नवरीचे एकमेकासोबत वेगवेगळ्या पोज मधले फोटो.. हे सोशल मिडियावर लाईक्स मिळवण्याचे साधन झाले आहे. आणि लाखो-करोडो रुपये खर्च करून केलेली लग्नं टिकतात तरी का? लग्नात इतके रुपये खर्च करताना आई वडील आपल्या मुला-मुलीकडून लिहून घेतात का, की हे लग्न आम्ही शेवटपर्यंत टिकवू? त्यात पुण्यात एखादी वैष्णवी हगवणे सारखी केस घडतेच. इतका खर्च करून देऊन लग्न करून दिलेली मुलगी हातची जाते.

आई होणे ही अत्यंत सृजनशील अशी गोष्ट आहे. स्त्रीच्या जन्माला पूर्णत्व देणारी ही गोष्ट. पण त्याही गोष्टीचा बाजार केला आहे. प्रिडिलिव्हरी शूट! मोठं पोट घेऊन नटून उभी असलेली मुलगी तिच्या शेजारी तिच्याकडे प्रेमाने बघणारा नवरा. अरे ही दोघांमधली गोष्ट आहे, तिचा असा जाहीरपणे बाजार काय करताय? सगळ्यात विचित्र प्रकार म्हणजे तो होणारा बाप खाली गुडघ्यावर बसून त्या होणाऱ्या आईच्या पोटाला किस करतानाचा फोटो काढणे. असे फोटो पाहताना हसायला येतं. फोटो जरुर काढा पण त्याला काही अर्थ असायला हवा.

मुंजीमध्ये अजूनतरी इतका उथळपणा पहायला मिळत नाही. तरी, मुंजा मुलाची एंट्री.. मग तो घोडा.. मग वरात.. मग त्यात नाचणे.. या गोष्टी होतातच. इव्हेंट मॅनेजमेंटवाल्यांचे दिवस चांगले नक्कीच आलेत.. पण तो इव्हेंट कसा मॅनेज करायचा हे आपण त्यांना ठरवून सांगितले पाहिजे. प्रत्येक विधीचा इव्हेंट करायलाच पाहिजे असे काही नाही. कुठे थांबायचं हे कळायला हवं. ते कळलं नाही तर अति तिथे माती व्हायला वेळ लागणार नाही !

पैशाची उधळपट्टी थांबायला हवी. म्हणूनच जेव्हा दोन आय टी प्रोफेशनल लग्न करायचं ठरवून अगदी साधेपणाने लग्न करतात आणि लग्नाचा खर्च आदिवासी पाड्यातील मुलांच्या शिक्षणासाठी दान करतात, अशी बातमी येते तेव्हा मन सुखावते! कुठेतरी अजूनही सद्सद्विवेकबुद्धी जागी आहे यावर विश्वास बसू लागतो!

विचार करण्यासाठी गोष्ट नक्कीच आहे.

**– प्राजक्ता पटवर्धन**
फोन :७७७४००८३९२

● ● ●

# मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा!

देहाकडून देवाकडे जाताना मध्ये देश लागतो आणि त्या देशाचे आपण देणे लागतो. तात्यारावांच्या ह्या वाक्यामुळे प्रेरित होऊन आपणही देशासाठी काहीतरी करावे असे कायम मला वाटते. आपल्या अनेक जन्माच्या पुण्यामुळेच आपला भारतभूमीमध्ये जन्म झाला. मला भटकंतीची आवड असल्यामुळे मी स्वराज्यातील गड किल्ल्यांवर कायम भटकत असतो. ह्या भटकंतीला आध्यात्मिक अनुष्ठान असावे यासाठी मी २०२१ साली पायी नर्मदा परिक्रमा केली व मैयाने ती निर्विघ्नपणे पूर्ण करून घेतली. देशाटन केल्यामुळे आपण अनुभवसंपन्न होतो. आपल्याकडे अनुभवाची श्रीमंती येते. आपल्याला विविध प्रांतातील भाषा, खाद्य, संस्कृती, हवामान, लोकांचे राहणीमान, तिथले अर्थकारण, समाजकारण या सर्व गोष्टींची कल्पना येते. नवीन परिचय होतात. समर्थ रामदास स्वामींनी देशाटन करताना अनुभवलेले यवनांचे राज्य, लोकांचे हाल, स्त्रियांवर होणारे अत्याचार व त्यामुळे होणारे धर्मांतरण, याचा परिपाक म्हणून हिंदू धर्मावर निर्माण होणारी लोकांच्या मनातली अनास्था ह्यामुळे समर्थांचे मन अस्वस्थ झाले व त्यांनी हिंदू धर्मनिष्ठा पुनर्जागृत व्हावी व त्यायोगे यवनांच्या अत्याचारास प्रतिकार करण्यासाठी सर्वांनी समर्थ व्हावे यासाठी संपूर्ण भारतभर अकराशे मठ व अकरा मारुती स्थापन केले. ह्या मठांमध्ये शारीरिक सामर्थ्य व मानसिक आरोग्य जोपासले जाऊन त्याचा छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य निर्मितीच्या कार्यात भरपूर उपयोग झाला. स्वामी विवेकानंद यांनी भारत भ्रमण करून आध्यात्मिक ज्ञान प्राप्त केले. लोकांना हिंदू धर्म व राष्ट्रीय चेतना याबद्दल जागृत केले व शिकागो अमेरिका येथे झालेल्या धर्म परिषदेत भारताचे नेतृत्व करून संपूर्ण जगाला हिंदूधर्म व भारत देश यांची दखल घेण्यास भाग पाडले.

आद्य श्री शंकराचार्यांनी भारताच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक एकीकरणासाठी व अन्य धर्मांकडून हिंदू धर्मावर होणारे आक्रमण थांबावे व लोकांमध्ये आपल्या धर्माबद्दल आस्था निर्माण व्हावी यासाठी भारताच्या चारही बाजूला उत्तरेमध्ये ज्योतिर्मठ, पूर्वेकडे गोवर्धन पीठ, पश्चिम बाजूस शारदा पीठ व दक्षिणेत शृंगेरी पीठ अशा चार मठांची म्हणजेच चार धामांची स्थापना केली. ह्या द्वारे अद्वैत वेदांताचा प्रसार करून हिंदू धर्माला एकत्रित करण्याचे काम श्री शंकराचार्यांनी भारत भ्रमणाच्या माध्यमातून केले.

देवभूमी उत्तराखंड येथे असलेल्या चार धामांची यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ यांची यात्रा व्हावी देवदर्शन घडावे व ही यात्रा सायकलवरून करून स्वतःचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य वाढवावे हा स्वार्थ व या स्वार्थांबरोबर सायकल यात्रा करताना अखंड भारताबद्दल समाजमनाचे लक्ष वेधून घ्यावे, ह्याबद्दल त्यांचे विचारचक्र सुरू व्हावे हा परमार्थ मनात ठेवून मी ओमकार शशी शेखर गाडगीळ, राहणार कोल्हापूर येथून देवभूमीतील चार धाम यात्रा सायकलवरून केली.

त्या प्रवासाचे वर्णन मी आपणासाठी लवकरच घेऊन येत आहे.

**– ओमकार शशी शेखर गाडगीळ**
**मोबा.**

●●●

# संजीवन समाधी घेतल्यानंतर शरीराचे काय होते?

'संजीवन समाधी घेतल्यानंतर शरीराचे काय होते?' ह्याचे उत्तर म्हणून माझ्या वाचनात आलेली माहिती देत आहे.

**संजीवन समाधी**

नाथ संप्रदायातील खऱ्या साधकांच्या ध्येयाची किंवा तपश्चर्येची शेवटची इच्छा म्हणजे समाधी अवस्था. पण जिवंत समाधी आणि संजीवन समाधी यातील फरक सदरील लेखात सांगितला आहे.

सद्गुरु भगवान श्री ज्ञानेश्वर महाराज हे अद्वितीय अवतार आहेत. त्यांच्या साऱ्याच गोष्टी अत्यंत अलौकिक आहेत. जसा त्यांचा जन्म अलौकिक तशीच त्यांची संजीवन समाधी देखील एकमेवाद्वितीय आहे. आजवर जगात केवळ भगवान सद्गुरू श्री ज्ञानेश्वर महाराजांनीच ही विशिष्ट अशी संजीवन समाधी घेतलेली आहे.

सामान्यत: लोक जिवंत समाधी व संजीवन समाधी यात गल्लत करतात. त्यामुळे कोणा महात्म्यांनी जिवंत समाधी घेतलेली असेल तर त्याला लोक संजीवन समाधीच म्हणतात. वस्तुत: संजीवन समाधी ही जिवंत समाधी पेक्षा खूपच वेगळी आहे. जिवंत समाधी घेतलेल्या महात्म्यांचाही कालांतराने नैसर्गिक मृत्यू होऊनच देहपात होत असतो. परंतु या संजीवन समाधीमध्ये मृत्यूच होत नाही, देहत्याग घडतच नसतो. या संजीवन समाधीची प्रक्रिया अत्यंत जटिल व विलक्षण आहे. नाथसंप्रदायातील अनेक महात्म्यांना ही प्रक्रिया सद्गुरुकृपेने ज्ञात असली तरी, श्रीभगवंतांच्याच आज्ञेने श्री ज्ञानेश्वर महाराजांनीच त्या प्रक्रियेचा अवलंब करून तशी संजीवन समाधी घेतलेली आहे. सर्व महात्म्यांनी मिळून तो केवळ श्री माउलींसाठीच एकमताने राखीव ठेवलेला विशेष अधिकार आहे, असे म्हणा हवे तर.

संजीवन समाधीच्या प्रक्रियेचा सूचक संकेत श्रीसंत नामदेव महाराजांनी माउलींच्या समाधिवर्णनाच्या आपल्या अभंगांत केलेला आहे. श्री नामदेवरायांच्या गाथ्यात श्रीज्ञानदेव समाधि महिमा नावाचे आणखी एक स्वतंत्र प्रकरण आहे. यात प्रत्यक्ष भगवान श्रीपंढरीनाथच, संतांच्या प्रेमळ विनंतीवरून श्री माउलींचे व त्यांच्या समाधीचे माहात्म्य कथन करीत आहेत. या प्रकरणातही काही विशेष संदर्भ मिळतात. त्यात श्री सोपानदेवांच्या समाधीचा उल्लेख करताना श्री पांडुरंग म्हणतात की, त्यावेळी हा ज्ञानदेवही दिव्यदेहाने आमच्यासारखाच सासवडला येईल तुझ्या समाधीसाठी. माउलींच्या संजीवन समाधीत त्यांचा देहत्याग घडलेला नाही, हेच देवही येथे सूचित करीत आहेत.

**सद्गुरु श्री माऊलींच्या संजीवनी समाधीबद्दलचे विशेष.....**

सद्गुरू श्री माउलींनी श्रीभगवंतांना समाधीची परवानगी मागितल्यावर, देवांनीच त्यांना आळंदीच्या त्यांच्या स्थानाची माहिती दिली. म्हणजे माउलींना ते माहीत नव्हते असे नाही, पद्धत म्हणून त्यांनी देवांना त्याबद्दल विचारले. आळंदीच्या सिध्देश्वर मंदिराच्या समोरील नंदीखाली असणारे समाधिविवर हेच माउलींचे अनादिस्थान आहे. तेथेच त्यांनी या पूर्वी एकशेआठ वेळा समाधी घेतलेली असून ही त्यांची एकशे नववी वेळ होती समाधी घेण्याची, असे नामदेवराय सांगतात. तेथूनच ते पुन्हा पुन्हा दरवेळी अवतार घेऊन येत असतात. देवांच्या सांगण्यानुसार नंदी हलवल्यावर खालचे विवर मोकळे झाले. नामदेवरायांच्या चारही पुत्रांनी ते स्वच्छ करून त्यातील चौथऱ्यावर मृगाजिन वगैरे घालून समाधीची सर्व सिद्धता केली.

आदल्या दिवशी, कार्तिक कृष्ण द्वादशीला प्रत्यक्ष श्रीभगवंतांनी स्वहस्ते दिव्य अन्न तयार करून माउलींना स्वत: भोजन वाढले . त्या अमृतमय अन्नामुळे माउलींच्या आत शरीरभर अमृतच तयार झाले.

कार्तिक कृष्ण त्रयोदशीला सकाळच्या वेळी माउलींची पूजा झाल्यावर, एकीकडून श्री निवृत्तिनाथ व एकीकडून श्रीभगवंतांनी हाताला धरून माउलींना त्या समाधिविवराच्या आत नेले. तेथील आसनावर बसून माउलींनी डोळे मिटून तीन वेळा नमस्कार केला, भीममुद्रा लावली आणि ते संजीवन समाधीत गेले. त्यानंतर श्री पांडुरंग व श्री निवृत्तिनाथ बाहेर आले.

संजीवन समाधी साधण्यासाठी तत्त्वांचा तत्त्वांमध्ये नाथ संप्रदायोक्त पद्धतीने लय केला जातो. सद्‌गुरू श्री माउलींनी समाधीविवरात बसल्यानंतर याच पद्धतीने तत्त्वांचा लय करायला सुरुवात केल्यावर, ती प्रक्रिया उपस्थित सर्व संतांना डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहता आली. पृथ्वीतत्त्वाचा जलतत्त्वात, जलाचा अग्नीत, अग्नीचा वायूत व वायूचा आकाशतत्त्वात लय झाला. आकाशाचा लय कशातच होत नसल्याने ते भगवती शक्तीच्या आकाशाशी, चिदाकाशाशी तदाकार होऊन राहते. ही प्रक्रिया माउलींच्या देहावर घडताना उपस्थित संतांना प्रत्यक्ष पाहता आली. पृथ्वी व जलतत्त्वाचा लय झाल्यावर माउलींच्या स्थूल शरीराचा भाग अदृश्य झाला आणि त्याजागी तेजोमय मूर्ती दिसू लागली. तेजतत्त्वही लय पावल्यावर समोरची ती तेजाकृती देखील दिसेनाशी झाली व केवळ नादरूपाने प्रचिती शिल्लक राहिली. ते वायूतत्त्वही आकाशात लय पावल्यावर तो नादही मावळून गेला व माउलींची संजीवन समाधीची प्रक्रिया पूर्ण झाल्याचे सर्वांना समजले. संजीवन समाधीचा अर्थ असा नाही की, माउलींनी देहत्याग केला. याच्या उलट प्रक्रियेने त्यांना केव्हाही हवे तेव्हा पुन्हा देहावर येता येते. मग ते जसे समाधीच्या पूर्वी होते तसेच पुन्हा आपल्याला दिसू लागतील. संजीवन सामाधीच्या रूपाने ते विश्वाकार होऊन राहिलेले आहेत.

जिवंत समाधी आणि संजीवन समाधी यात हाच फार मोठा फरक आहे. जातस्यहि ध्रुवो मृत्यु: या नियमानुसार जिवंत समाधी घेतलेल्या महात्म्यांचा पांचभौतिक देह कालांतराने विघटन पावतो, कारण तो असा तत्त्वांचा लय करून अदृश्य केलेला नसतो. ही माहिती नसल्यामुळेच सामान्यपणे लोक जिवंत समाधीला संजीवन समाधी म्हणतात. परंतु आजवर केवळ आणि केवळ भगवान श्री ज्ञानेश्वर माउलींनीच अशी संजीवन समाधी घेतलेली आहे. म्हणूनच सद्‌गुरु श्री माउलींची ही संजीवन समाधी एकमेवाद्वितीय म्हटली जाते ! इथे कोणाही महात्म्यांची मी श्री माउलींशी तुलना करत नाहीये. जिवंत समाधी घेतलेले सर्व महात्मे श्री माउलींसारखेच थोर आणि पूजनीयच आहेत. फक्त जो वास्तविक भेद आहे दोन्हीतला तेवढाच मी येथे मांडत आहे. कृपया कोणीही तसा गैरसमज करून घेऊ नये.

श्रीसंत महात्मे यासाठीच श्रीक्षेत्र आळंदीला व सद्‌गुरु श्री माउलींच्या समाधीला नित्यतीर्थ म्हणतात. हे कधीच नष्ट न होणारे असे कालजयी तीर्थ आहे, म्हणूनच ते नित्यतीर्थ होय. श्री माउलींचे समाधीविवर हे सूक्ष्म स्तरावरील आहे. तेथे पाचभौतिकताच नाही कसलीही. त्यामुळे तेथे प्रवेश करण्यासाठी आपला हा पांचभौतिक देह उपयोगाचा नसतो. तेथे केवळ दिव्य देहानेच प्रवेश होऊ शकतो. या समाधीविवराला कालाचा स्पर्शच नाहीये. तिथे काळ कार्यच करीत नसल्याने, त्यावेळी आत वाहिलेली फुले आजही जशीच्या तशी टवटवीत आहेत. त्यावेळी ठेवलेला पंचखाद्याचा नैवेद्यही साडेसातशे वर्षे उलटली तरी जसाच्या तसाच आहे.

सद्‌गुरु श्री माउलींच्या कृपेने या

(पुढील मजकूर पान १८ वर पहा.)

## जन्मापासून मृत्यूपर्यंत सर्व काही व्यवहार जातीच्या आधारावर आणि

# अपेक्षा जाती विरहित हिंदुसमाजाची !

अनादि काळापासून हिंदू धर्मामधे चातुर्वर्ण्याच्या अधारावर समाजरचना अस्तित्वात होती. त्या त्या काळात ती योग्यही असेल, परंतु आज त्याचे दुष्परिणाम आपणास पाहावयास मिळत आहेत. हिंदु धर्मातील धर्मगुरु, बुद्धिजीवी, विद्वान मंडळी लाख ओरडून सांगत आले की कर्म व्यवसायाप्रमाणे जाती ठरत होत्या, परंतू आज फक्त आणि फक्त जन्मानुसारच जाती ठरतात हे एक कटुसत्य आहे. सर्व जातीतील लोक हिंदू धर्मानुसार आचरण, धार्मिक विधी, पूजापाठ करीत असले तरी ते एकत्रितपणे करीत नसल्यामुळेच जन्मानुसार वेगवेगळ्या समूहात हिंदू धर्म विखुरला गेलेला आपणास पाहावयास मिळतो. आपला देश सुजलाम सुफलाम अर्थात साधन संपत्तीने संपन्न असल्यामुळेच त्यावर परकीय आक्रमणे झाली आणि आपल्याकडील समाज रचनेमुळेच त्याना एकत्रित प्रतिकारही झाला नाही आणि त्याचाच परिणाम म्हणजेच आपल्यावर आलेली गुलामगिरीची नामुष्की! तीही थोडी थोडकी नाही तर हजारो वर्ष. त्या नंतर सर्व जगावर राज्य करणाऱ्या अत्यंत मुत्सद्दी, क्रूर, प्रशासकांनी याच गोष्टींचा फायदा घेऊन आपल्यावर दीडशे वर्ष राज्य केले. मुगलांनी इथल्या फक्त साधन संपत्तीची लुटमार न करता तलवारीच्या जोरावर इस्लामीकरण करून आपली संख्या वाढविली आणि संपूर्ण देशात आपली सत्ता दीर्घ काळ असावी या दृष्टिकोनातून आपली रणनीती आखली आणि हिंदू धर्मातील अवगुणांमुळेच ते यशस्वीही झाले. सत्तेविरूद्ध ज्यांनी आव्हाने दिली त्यांच्याविरूद्ध अत्यंत क्रूरपणे प्रत्यक्ष कारवाई करतांना आपल्याच सैनिकांचा वापर मुगलांनी जास्त प्रमाणात केला आणि आपली दहशत बसविली. परंतु इंग्रजांनी मोठ्या हुशारीने याच शिक्षेची प्रत्यक्ष अंमलबजावणी आपल्या लोकांकडून केली आणि आपल्या जातीजातीतील वैमनस्य, शत्रुत्व वाढविले. आणि म्हणूनच इंग्रजांची फोडा आणि झोडा ही त्यांची कूटनिती यशस्वी झाली आहे असे म्हणावेसे वाटते.त्यासाठी मुद्दामून एका गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो तो म्हणजे इंग्रज जाऊन पंचाहत्तर वर्षे झाली तरी आपण कोरेगांव भीमाचा विजय उत्सव साजरा करतो आहोत!

हा इतिहास प्रथम आपल्यासमोर मांडण्याचा उद्देश एकच जो देश आपला इतिहास विसरतो त्या देशाचे भविष्य उज्ज्वल नसते असे म्हणतात. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इतिहासातील चुका लक्षात घेऊन त्या काळातील नेत्यांकडून पुढील वाटचाल निश्चित करणे अपेक्षित होते.अर्थात जातीजातीत विखुरलेल्या हिंदु समाजाला एकाच अर्थिक, शैक्षणिक, सामाजिक पातळीवर आणण्यासाठी सरकारकडून आणि समाजाकडून प्रयत्न होणे आवश्यक होते.त्याचाच एक भाग म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या समाज रचनेमुळेच ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे त्यांच्यासाठीच आरक्षण देवून त्यांना विषेश संरक्षण दिले होते. आणि त्याचाही अतिरेक होऊ नये म्हणून एका ठरावीक मुदतीची अट घातली होती.

त्या आरक्षणाच्या नावाखाली मागासवर्गीय समाजाला राष्ट्रीय प्रवाहात आणण्याऐवजी इतर समाजापासून लांब ठेवून त्याचा फायदा आपल्याच राजकीय फायद्यासाठी राजकीय पक्षांकडून, तसेच स्वत:च्या सामाजिक नेतृत्वासाठी करण्यात आला

हे वास्तव नाकारता येणार नाही.यापुढील काळात जर खरोखरच जातीविरहीत हिंदू समाज निर्माण व्हावा आणि त्याचबरोबर देशही संघटीत व्हावा अशी इच्छा असेल तर सरकारी पातळीवर, तसेच सामाजिक स्तरावर खालील कार्य पद्धतीचा अवलंब केला जावा असे वाटते.

१) सरकारकडून आणि स्थानिक प्रशासनाकडून जन्माला आलेल्याच्या जन्म दाखल्यात फक्त आणि फक्त हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन असाच उल्लेख करण्याची सक्ती करावी.

२) सर्व राजकीय पक्षांकडून जातीनिहाय सभा, संमेलन घेऊन त्यांच्यासाठीच प्रलोभने, मदतीची आश्वासने देण्यावर प्रतिबंध असावा.

३) जन्माच्या आधारावर जातीनिहाय असलेल्या सामाजिक, राजकीय संघटनांवर कायद्याने बंदी आणावी.

४) व्यवहारात राष्ट्रपुरुषांचा आणि महिलांचा जातीचा उल्लेख कटाक्षाने टाळावा. तसा उल्लेख गुन्हा ठरविण्यात यावा.

५) कोणत्याही सामाजिक गुन्हेगाराचा आणि पिडीतांचा प्रसार माध्यमातून त्यांचा जातीचा उल्लेख टाळावा. त्यावर कायद्याने प्रतिबंध असावा.

६) निवडणूक विश्लेषणात्मक कार्यक्रमातून जातीनिहाय सर्वेक्षणावर प्रतिबंध असावा.

या सर्व गोष्टी प्रत्यक्ष अमलात आणावयाच्या असतील तर सरकारी पातळीवर फार मोठा धाडसी निर्णय घ्यावा लागेल तो म्हणजे कोणतेही आरक्षण आर्थिक कसोटीवरच द्यावे लागेल. त्यामुळे जाती जातीतील दुरावा कमी होण्यास मदत होईल आणि समाजातील खऱ्या दिनदुबळया, मागासलेल्या वर्गाला मदत मिळेल आणि ते राष्ट्रीय प्रवाहात येतील.

वाचा आणि आपली बहुमूल्य प्रतिक्रिया कळवा.

**– मोहन नातू** (मोबा. :८८८८८५४९३०)

● ● ●

### संजीवन समाधी घेतल्यानंतर शरीराचे काय होते?

(पान नं. १६ वरून पुढे चालू)

समाधिविवराच्या आत जाण्याचे सद्भाग्य आजवर केवळ बोटावर मोजण्या इतक्या सत्पुरुषांनाच लाभलेले आहे. पण आश्चर्य म्हणजे या सर्व महात्म्यांनी आतील देखाव्याचे केलेले वर्णन शब्दश: एकच आहे. माउलींच्या समाधिसोहळ्यास श्रीसंत जनाबाई उपस्थित नव्हत्या. म्हणून त्या जेव्हा त्यानंतर पहिल्यांदा आळंदीला आल्या, त्यावेळी माउलींनी त्यांना संजीवन समाधीचा तो संपूर्ण सोहळा दिव्यदृष्टीने पुन्हा दाखवला होता. श्री माउलींचे त्यांच्यावर पुत्रवत् प्रेम होते, म्हणूनच जनाबाईंसाठी त्यांनी ही विलक्षण लीला केली.

श्रीसंत एकनाथ महाराजांचा प्रसंग आपल्याला सर्वांना ज्ञात आहेच. माउलींच्या गळ्याला टोचणारी अजानवृक्षाची मुळी कापण्यासाठी ते या समाधीविवरात गेले होते. त्यानंतर साधारणपणे दोनशे वर्षांपूर्वी, श्री चिदंबर महास्वामींच्या शिष्या श्रीसंत विठाबाई महाराजांना श्री माउलींच्या कृपेने हे सद्भाग्य लाभले.

गंमत म्हणजे श्रीसंत विठाबाईंचे अभंग मला काही वर्षांपूर्वी वाचायला मिळाले होते.

सद्‌गुरु श्री ज्ञानदेवांच्या समाधिस्थ स्वरूपाविषयी आपल्या श्रीज्ञानदेव विजय ग्रंथातील ओळ

ज्ञानेशांची समाधिस्थिती।
पुनश्च येणे देहावरती।
याची घेतली प्रचिती।
त्रिशतकोत्तर नाथांनी ॥ १५.६३

(पुढील मजकूर पान २१ वर पहा.)

# GST नोंदणी आणि पालन

**GST म्हणजे काय?**

वस्तू आणि सेवा कर (GST) ही एक अप्रत्यक्ष कर प्रणाली असून, यात यापूर्वीचे विविध अप्रत्यक्ष कर (VAT, सेवा कर इ.) एकत्रित करण्यात आले आहेत.

१. **GST** नोंदणी (Registration):

खालील उलाढाल मर्यादेपेक्षा जास्त उलाढाल असणाऱ्या व्यावसायिकांना GST नोंदणी आवश्यक : वस्तूंचा पुरवठा : रु. ४० लाखांपेक्षा जास्त, सेवा पुरवठा : रु. २० लाखांपेक्षा जास्त

विशेष श्रेणी राज्य (अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, त्रिपुरा, सिक्कीम) : वस्तू : रु. २० लाख; सेवा : रु. १० लाख

**विशेष बाब:**

वरील उलाढाल कमी असली तरी, खालील परिस्थितीत **सक्तीने GST नोंदणी आवश्यक :**

- Inter-State Supply **आंतरराज्य** वस्तू पुरवठा
- Casual Taxable Person (प्रासंगिक करयोग्य व्यक्ती) - म्हणजे अशी व्यक्ती जी कुठल्याही राज्यात किंवा केंद्रशासित प्रदेशात एकदा-एकदा किंवा प्रासंगिक स्वरूपात व्यवसाय करते, पण त्या ठिकाणी तिचे कायमस्वरूपी व्यवसायाचे ठिकाण नसते.
- Reverse Charge Mechanism (उलट शुल्क प्रणाली) अंतर्गत कर भरणारे.
- Non-resident Taxable Person (अनिवासी करयोग्य व्यक्ती)
- TDS (Sec. 51) कापणारे
- TCS (SEc 52) ई-कॉमर्स ऑपरेटर
- एजंट म्हणून काम करणारे
- Input Service Disributor (इनपुट सेवा वितरक)- **इनपुट सेवा वितरक (ISD)** म्हणजे असे कार्यालय किंवा युनिट जे आपल्या संपूर्ण संस्थेमध्ये घेतलेल्या **सेवांवरील इनपुट टॅक्स क्रेडिट** (ITC) इतर शाखा, युनिट्स किंवा विभागांमध्ये **वाटून देते.**
- OIDAR सेवा पुरवठा करणारे - ऑनलाइन जाहिरात,क्लाउड कम्प्युटिंग सेवा, डिजिटल सामग्रीचे वितरण,ई-बुक्स, सॉफ्टवेअर अॅज अ सर्व्हिस (SaaS) आणि ऑनलाइन गेमिंग.
- सरकारने निश्चित केलेले इतर वर्ग

**GST नोंदणी न लागणारे व्यवसाय :**

- पूर्णत: करमुक्त सेवा/वस्तू पुरवठा करणारे
- Reverse Charge लागू असलेल्या सेवांचे पुरवठादार
- Job Worker रु. २० लाखांपर्यंत उलाढाल (विशेष श्रेणी राज्य रु. १० लाख)
- ई-कॉमर्समार्फत सेवा पुरवठादार रु. २० लाखांपर्यंत उलाढाल

**GST नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे :**

**सर्वसाधारणपणे आवश्यक कागदपत्रे (सर्व प्रकारच्या नोंदणीसाठी लागू):**

- PAN कार्ड - व्यवसायाचे किंवा कंपनीचे (कंपनी असल्यास).
- व्यवसायाची नोंदणीचा पुरावा (उदा. व्यवसाय परवाना, Udyam नोंदणी इ.)

- Memorandum of Association (MOA) / Articles of Associaton (AOA) - जर कंपनी असेल तर.
- प्रत्येक अधिकृत प्रतिनिध्याचे PAN कार्ड, आधार कार्ड आणि छायाचित्रे
- अधिकृत प्रतिनिधीच्या नियुक्तीचा पुरावा
- करदात्याचे छायाचित्र
- करदात्याचा पत्ता पुरावा
- मुख्य कार्यालयाचा (Principal Place of Business) पत्ता पुरावा
- बँक खात्याचे तपशील
- डिजिटल स्वाक्षरी (Digital Signature) जर लागू असेल तर.

**व्यक्तीगत व एकल मालकी व्यवसायासाठी (Sole Proprietor) GST नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे :**

- मालकाचे PAN कार्ड
- मालकाचा आधार कार्ड
- मालकाचे छायाचित्र
- मालकाचा पत्ता पुरावा (उदा. विजेचे बिल, भाडे करार)
- बँक खात्याचे तपशील
- मुख्य व अतिरिक्त व्यवसाय ठिकाणाचे पुरावे

**कंपनीसाठी GST नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे :**

- कंपनीचे GST कार्ड
- MCA नोंदणी प्रमाणपत्राची प्रत (Incorporation Certificate from MCA)
- MOA / AOA (Memorandum / Article of Association)
- सर्व संचालकांचे PAN कार्ड व पत्ता पुरावे
- मुख्य कार्यालयाचा पत्ता पुरावा
- बँक खात्याचे तपशील
- अधिकृत प्रतिनिधीचे PAN कार्ड व आधार कार्ड
- प्रतिनिधीची नियुक्ती असल्याचा पुरावा (उदा. निदेशक मंडळाचा ठराव)
- मुख्य व अतिरिक्त व्यवसाय ठिकाणाचे पुरावे

२. **GST** रिटर्न:

- **GSTR-1 :** मासिक (पुढील महिन्याच्या ११ तारखेपर्यंत), तिमाही (तिमाही संपल्यानंतर पुढील महिन्याच्या १३ तारखेपर्यंत)
- **GSTR-3B :** पुढील महिन्याच्या २०/२२/२४ तारखेपर्यंत.
- **GSTR-9 :** वार्षिक (आर्थिक वर्ष संपल्यानंतर डिसेंबरच्या ३१ तारखेपर्यंत)
- **GSTR-2A :** पुरवठादार जेव्हा आपला GSTR-1 फाईल करतो, तेव्हा त्या पुरवठादाराने टाकलेल्या पावत्या GSTR-2 मध्ये संबंधित ग्राहकाच्या नावावर दर्शविल्या जातात.
- **GSTR-2B :** GSTR-2B रिअल-टाईम डेटावर आधारित नसतो. तो पुरवठादाराच्या GSTR-1 आणि GSTR-3B मधून मिळालेल्या माहितीच्या आधारे तयार केला जातो.
- GSTR-2B करदात्यासाठी उपलब्ध इनपुट टॅक्स क्रेडिटचे संक्षिप्त रूप दाखवतो. एकदा तयार झाल्यानंतर हा दस्तऐवज **स्थिर** (**static**) असतो आणि त्यात कोणताही बदल करता येत नाही. अननोंदणीकृत विक्रेत्यांकडून खरेदी दर्शवली जात नाही.

**३. संमिश्र योजना (Composition Scheme)**

- उलाढाल मर्यादा : रु. १.५ कोटीपर्यंत (सेवा पुरवठा रु. ५० लाख)

- कर दर : वस्तू उत्पादक/व्यापारी १%; सेवा पुरवठादार ६%
- तिमाही CMP-08 आणि वार्षिक GSTR-4 भरणे आवश्यक

**४. पालन न केल्यास दंड :**

- नोंदणी न घेतल्यास: थकबाकी कराच्या १००% रकमेइतका किंवा रु. १०,०००/- यापैकी जे अधिक असेल ते आकारले जाईल. रिटर्न उशिरा दाखल केल्यास दररोज रु. ५० (रु. २५ CGST अंतर्गत आणि रु. २५ SGST अंतर्गत) दंड आकारला जातो, जो कमाल रु. ५,००० पर्यंत मर्यादित आहे. तसेच थकबाकी कर रकमेवर दरवर्षी १८% व्याज आकारले जाते.
- चुकीच्या ITC वापरल्यास : व्याजासहित दंड

**GST कायद्यांतर्गत प्रत्येक नोंदणीकृत व्यक्तीने योग्य नोंदी (records) आणि खाती (accounts) ठेवणे आवश्यक आहे. या संदर्भातील महत्त्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत :**

- **CGST कायदा, २०१७ च्या कलम ३५** नुसार प्रत्येक नोंदणीकृत व्यक्तीने खालील बाबींची खरी व अचूक नोंद ठेवावी:
  वस्तूंचे उत्पादन किंवा निर्मिती, वस्तू किंवा सेवांची ये-जा (Inward / Outward supply), वस्तूंचा साठा, प्राप्त केलेला इनपुट कर सवलत (Input Tax Credit), देय व भरलेला बाह्य कर (Output Tax) आणि इतर तपशील जसे नियमांद्वारे सांगितले आहेत.
  ही खाती व्यवसायाच्या मुख्य ठिकाणी ठेवावी लागतात.
- कलम ३६ नुसार नोंदी (Records) व खाती (Accounts) किती काळ ठेवायची:
  वार्षिक रिटर्न भरण्याच्या दिनांकापासून ७२ महिने (६ वर्षे) या कालावधीसाठी खाती व नोंदी ठेवणे आवश्यक आहे.

जर संबंधित व्यक्ती अपील (Appeal), पुनरावलोकन (Revision) किंवा तपासणीच्या (Investigation) प्रक्रियेत सहभागी असेल, तर अंतिम निर्णयानंतर १ वर्ष किंवा ६ वर्षे, यापैकी जे अधिक असेल त्या कालावधीपर्यंत नोंदी ठेवाव्यात.

**महत्त्वाच्या सूचना:**

- GST Return आणि कर भरणा वेळेवर करावा.
- Tax Invoice व्यवस्थित जतन करावे.
- GST तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

**अधिक माहिती:**

- GST Portal : https//www.gst.go.in/
- Maharashtra GST Department

**- मोहन दामले**
मोबा. : ९१५६३५७७८९

---

**संजीवन समाधी घेतल्यानंतर शरीराचे काय होते?**

(पान नं. १८ वरून पुढे चालू)

पूर्वजांनी जया पाहिले ।
तया नाथांनीही देखिले ।
आजही तैसेचि संचले ।
समाधिस्थ ज्ञानेश्वर ॥ १५.६५

भगवान सद्‌गुरू श्री ज्ञानेश्वर महाराज हे नित्यअवतार असल्याने, आजही त्याच रूपाने समाधिस्थ राहून ते आपल्या भक्तांवर कृपाप्रसाद करीत आहेत. कलियुगात देव एक ज्ञानेश्वर महाराजच आहेत.

सद्‌गुरु श्री माउली हे जसे एकमेवाद्वितीय अवतार आहेत, तशीच त्यांची संजीवन समाधी देखील एकमेवाद्वितीयच आहे!! त्यांच्यासारखे केवळ तेच ! अलौकिक, अद्‌भूत, अनिर्वचनीय आणि अपरंपार

(पुढील मजकूर पान २२ वर पहा.)

# इतिहासातील कर्तृत्ववान ब्राह्मण स्त्रिया

भारताची संस्कृती महान मानली जाते कारण या संस्कृतीतील संस्कार महान आहेत. ही संस्कृती जपण्याचे, वर्धन करण्याचे अन् प्रवाहित ठेवण्याचे काम विशेषत्वाने स्त्रियांनी केले आहे.

धर्मशास्त्रांनी घालून दिलेले नीतिनियम, प्रथा, परंपरा, व्रतवैकल्ये, चालीरिती इ. गोष्टींची जपणूक स्त्रियांनी केली.

ब्रह्मवादिनी गार्गी, वेदांच्या जाणकार विविध स्त्रिया, अन् इतिहासातील कर्तृत्ववान महिला ज्यांनी राजकारण, समाजकारण, शिक्षण, वैद्यकीय आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये भरीव योगदान दिले आहे. या महिलांनी आपल्या कार्यामुळे देशाला आणि समाजाला प्रेरणा दिली आहे आणि इतिहास घडवला आहे.

प्राचीन भारतात महिलांना सर्व क्षेत्रांत मानाचे स्थान होते आणि कर्तृत्व गाजविण्याची संधी होती.

इतिहासाच्या प्राचीनकालीन, मध्य कालखंडातील सुलतानशाही, मोगलशाही, मराठेशाही, पेशवेकालीन, भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया, सामाजिक चळवळीतील, भक्ती संप्रदायातील, शैक्षणिक चळवळीतील, राजकीय, वैज्ञानिक, क्रीडा प्रशासकीय, अशा विविध क्षेत्रात स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने सक्रिय भूमिका बजावली. सामाजिक अन्याय, दुष्ट चालीरिती याविरुद्ध दिलेला अथक लढा आणि भारतीय कला, क्रीडा, साहित्य आणि सांस्कृतिक प्रगतीच्या सर्व क्षेत्रांचे पुनरुज्जीवन करण्याचे दमदार कार्य अनेक स्त्रियांनी केले आहे.

या स्त्री वर्गातील भारतीय ब्रह्मवृंद महिलांनी किती मोठे कार्य केले होते. हे आजच्या पिढीला कितपत माहिती आहे? आजच्या पिढीने याची जाणीव ठेवावी, आजच्या युगातील महिलांना प्रेरणा मिळावी आणि समाजाची महिलांकडे बघण्याची दृष्टी बदलावी,या परिवर्तनाला चालना मिळावी म्हणून त्यांनी केलेले कार्य, त्यांनी दाखवलेले कर्तृत्व याची तुम्हाला माहिती करून द्यावी... एवढाच वसा आम्ही संभाळणार आहोत..

नव्या वर्षापासून ही लेखमाला सुरू करीत आहोत.

**- वैदेही जोशी मो.**

● ● ●

---

**संजीवन समाधी घेतल्यानंतर शरीराचे काय होते?**

(पान नं. २१ वरून पुढे चालू )

कनवाळू !! त्यांचे पावन नाम घेण्याची, त्यांच्या दिव्य चरित्राचे अनुसंधान राखण्याची आणि त्यांचेच स्वरूप असणारे त्यांचे वाङ्मय वाचण्याची, त्याचे मनन-चिंतन करण्याची संधी व सद्बुद्धी दोन्ही आपल्याला लाभत आहे, हेच माउलींची आपल्यावर अद्भुत कृपा असल्याचे प्रतीक आहे, यात शंकाच नाही !

या देवदुर्लभ भाग्यासाठी परमकनवाळू करुणाब्रह्म भगवान सद्गुरू श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या श्रीचरणीं, सर्वांच्या वतीने कृतज्ञतापूर्वक अनंतकोटी दंडवत प्रणाम करून त्याच अनुपम-सुखदायक श्रीचरणीं, त्यांच्या महन्मंगल जयंतीपर्वाच्या पूर्वसंध्येला तुलसीदल रूपाने विसावून धन्य होतो !

● ● ●

# कोल्हापूर चित्पावन संघाची आपत्तीग्रस्तांना मदत



नुकत्याच विदर्भ मराठवाडा प्रांतात झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभुमीवर कोल्हापूर चित्पावन संघाकडून आपत्तीग्रस्त नागरिकांसाठी २५ हजार रुपयांची मदत मुख्यमंत्री सहाय्यक निधी कक्षाकडे कोल्हापूरचे जिल्हाधिकारी श्री. अमोल येडगे यांच्यामार्फत पाठविण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी श्री. अमोल येडगे आणि कक्षाचे डॉ. चंद्रकांत परुळेकर यांनी हा मदतीचा धनादेश स्वीकारला.

यावेळी संघाचे अध्यक्ष श्री. मकरंद करंदीकर म्हणाले, आपण समाजाचे काही देणे लागतो. या हेतूने आम्ही राज्यातील नुकसानग्रस्त नागरिकांसाठी मदत देवू केली आहे. उपाध्यक्ष प्रसाद भिडे यांनी संघातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी संघातर्फे मा. जिल्हाधिकारी श्री. अमोल येडगे यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास संघाचे कार्यवाहक केदार जोशी, संतोष साने, सीए विकास परांजपे, सीमा गोखले, नंदकुमार मराठे, निखिल गोखले, श्रीकांत लिमये, दत्तात्रय आपटे, संगीता आपटे, ऋषिकेश लिमये, किरण जोशी, सौरभ पाटणकर, गोपाळ गोरे आदि उपस्थित होते.

● ● ●

## कोल्हापूर चित्पावन संघातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!

आपल्या संघाचे सभासद श्री. उत्तम नातू यांचे चिरंजीव **सुजीत उत्तम नातू** यांचे रविवार, दि. २ नोव्हेंबर २५ रोजी पुणे येथे दु:खद निधन झाले!

कोल्हापूर येथील श्री. गिरीष अभ्यंकर यांच्या मातोश्री **श्रीमती मंगला अभ्यंकर** यांना दि. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी वृद्धापकाळाने देवाज्ञा झाली.

आपल्या संघाचे सभासद श्री. मंदार कुंटे यांचे वडिल **श्री. विनायक कुंटे** यांचे शुक्रवार, दि. ७ नोव्हेंबर २५ रोजी दु:खद निधन झाले!

कोल्हापूर येथील पेठे ॲकॅडमीचे श्री. सुनील पेठे यांच्या मातोश्री **सौ. सुषमा सदानंद पेठे** यांना मंगळवार, दि. २ डिसेंबर २५ राजी देवाज्ञा झाली!

**वरील निधन पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांच्या दु:खात चित्पावन संघ सहभागी आहेत.**

# कोल्हापूरच्या संगीत रसिकांना लवकरच चित्पावन संघाची
# ‘जादूई पेटी’ ची सांगितिक मेजवानी





नव्या वर्षात रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी कोल्हापूर चित्पावन संघातर्फे संगीत रसिकांना जादूई पेटीची सांगीतिक मेजवानी देण्यात येणार आहे.

विख्यात हार्मोनियम वादक आदित्य ओक आणि देशविदेशातील ६००० पेक्षा जास्त कार्यक्रमांमधून तसेच सारेगमपच्या व्यासपीठावरून ज्याने आपले वेगळे वैशिष्ट्य सिद्ध केले असा अष्टावधानी अवलिया की बोर्ड आर्टिस्ट सत्यजित प्रभू हे एकत्र येऊन ही मैफल रंगवतात. त्यांना सुविख्यात तबला वादक प्रसाद पाध्ये, ढोलकी, ढोलक, ऑक्टापॅड वादक प्रभाकर मोसमकर, गिटारीस्ट संजय महाडिक आणि हॅण्डसॉनिक वादक मंदार गोगटे हे साथ संगत करतात.

हामोर्नियम या वाद्याच्या जन्मापासून त्याचा सांगीतिक प्रवास या मैफलीत अतिशय रंजकपणे उलगडून दाखवला जाणार आहे. जन्माने मुळची पाश्चात्य असूनही गेल्या पावणे दोनशे वर्षात भारतीय संगीताचा प्राण ठरलेली पेटी किंवा भारतीय संगीत नाटकातील पायपेटी यांचा प्रामुख्याने वापर असणारी पारंपरिक नांदी, नाट्यसंगीत, शास्त्रीय बंदिश यासह हिंदी मराठी सिनमातील अनेक लोकप्रिय गीते या कार्यक्रमात सादर करून श्री. आदित्य ओक आणि श्री. सत्यजित प्रभू रसिकांना मंत्रमुग्ध करतात.

दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी आनंद भवन, सायबर कॅम्पस्, शिवाजी विद्यापीठ रोड, कोल्हापूर येथे सायंकाळी ४ वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

● ● ●

## हार्दिक अभिनंदन !

कोल्हापूर येथील
**कु. जान्हवी करमरकर**
आणि
**कु. प्रिया रानडे**
यांनी नुकतीच चार्टर्ड अकौंटंट
ही परिक्षा उत्तीर्ण करून
सनदी लेखापाल ही पदवी
मिळविल्याबद्दल कोल्हापूर चित्पावन
संघाकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन आणि
त्यांच्या पुढील वाटचालीस अनेक
हार्दिक शुभेच्छा!













## कोजागरी पौर्णिमा

दरवर्षीप्रमाणे यंदाही दि. ११ ऑक्टोबर रोजी कोजागरी पौर्णिमा साजरी करण्यात आली. समारे ८० उपस्थितांनी दडपे पोह्यांचा उपहार आणि दुग्धपानाचा आनंद घेतला. अतिशय उत्साहाने, खेळीमेळीच्या वातावरणात हा सोहळा पार पडला.



## रक्तदान शिबीर

परशुराम सोशल फौन्डेशन, ब्राह्मण सभा करवीर मंगलधाम व कोल्हापूर चित्पावन संघ यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापूरातील संजीवन ब्लड बँकेमार्फत रक्तदान शिबीर दि. १६/११/२०२५ रोजी घेण्यात आले. या शिबिरात ७७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सर्व रक्तदात्यांचे आभार!






**या कार्यक्रमाच्या प्रवेशिका कोल्हापूर चित्पावन संघ आणि परशुराम पतसंस्था कार्यालयात उपलब्ध आहेत.**

## विदुषी शमिका भिडे यांचा परिचय

झी मराठी सारेगमप लिटल चॅम्प्स २००८ मधून घराघरात पोहचलेली शमिका, हिचं संगीतातील प्राथमिक शिक्षण श्री. प्रसाद गुळवणी व सौ. मुग्धा भट सामंत, रत्नागिरी यांचेकडे झाले आणि गेली १२ वर्ष विदुषी डॉ. अश्विनी भिडे देशपांडे यांच्याकडे जयपूर अत्रौली घराण्याची तालीम व सांगीतिक संस्कार प्राप्त करण्याचं भाग्य तिला मिळालं.

आपल्या गुरु व आई वडिलांच्या आशीर्वादाने अनेक पुरस्कारांची मानकरी असलेली शमिका आज अनेक दिग्गज कलाकारांसोबत विविध संगीत कार्यक्रमांमधून रसिकांपर्यंत आपली कला सादर करते आहे.

**उल्लेखनीय कामगिरी –**


दे धक्का, सोयरिक, पल्याड चित्रपटांसाठी पार्श्वगायन, कलर्स मराठी, सोनी मराठी, शीमारू या चॅनलसाठी टायटल साँग्स तिनं गायली आहेत. संगीत मेघदूत व संगीत चि.सौ.कां. रंगभूमी या संगीत नाटकांमध्ये भूमिका, अखिल भारतीय नाट्य परिषद २०१९ सर्वोत्कृष्ट गायिका अभिनेत्री पुरस्कार, दादर माटुंगा कल्चरल सेंटर मुंबई – उदयोन्मुख गायिका अभिनेत्री पुरस्कार, झी टॉकीज महाराष्ट्राचा फेवरेट कोण २०२२ मध्ये सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका नामांकन, झी मराठी लिटल चॅम्प्स २०२३ साठी मेंटॉर, अमेरिका, अबुधाबी, कुवेत, ऑस्ट्रेलिया या देशात सांगीतिक दौरे, ५० हून अधिक इंडिपेंडंट गाणी रिलीज़ झाली असून अनेक अल्बममध्ये गायन, अनेक वेबसिरीजमध्ये पार्श्वगायन, अनेक संगीत महोत्सवांमध्ये शास्त्रीय व उपशास्त्रीय संगीत मैफिल.

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2025-2027


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

Quality Approvals
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




HEAD OFFICE :
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

FACTORY :
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

E-mail :
info@shogini.com

Visit us at :
www.shogini.com


प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून, कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.